# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

## नाटय परिषदेची स्वस्त आणि दर्जेदार नाटक योजना

नाटय परिषद सभासद आणि रसिकांसाठी नाटय परिषदेतर्फे स्वस्त नाटक योजना जून २००७ पासून सुरू करण्यात आली. तीच योजना याही वर्षासाठी सुरू ठेवण्यात आली असून गेल्या वर्षाप्रमाणेच रसिकांना दहा दर्जेदार कार्यक्रम फक्त ८००/६००/४००/३०० रूपयांत दाखविण्यात येत असून आतापर्यंत सात कार्यक्रम दाखविण्यात आले आहेत. एकूण २३८ सभासद या योजनेचा लाभ घेत आहेत.

## एकांकिका स्पर्धा

नाट्य परिषदेतर्फे शाखा - शाखात व घटक संस्थांममध्ये 'कै. प्रा. डॉ लक्ष्मणराव देशपांडे एकांकिका स्पर्धा' ही राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा सुरू करण्यात आली. यावर्षीच्या एकांकिका स्पर्धेत नाट्य परिषदेच्या ५० शाखांपैकी २८ शाखांनी भाग घेतला होता एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी नाट्य परिषदेच्या यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा, मुंबई येथील नाट्यगृहात दिनांक १३ डिसेंबर २०१० रोजी घेण्यात आली. अंतीम फेरीसाठी निवडण्यात आलेल्या ७ एकांकिकांमधून पहिल्या तीन एकांकिकांना रोख बक्षीसे देण्यात आली. ती खालीलप्रमाणे :-

| सर्वोत्कृष्ट एकांकिका | एकांकिकेचे नांव | शाखेचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|
| प्रथम | 'कोलाहल' | सोलापूर उपनगरीय | १५,००० |
| द्वितीय | 'अशील' | पुणे उपनगरीय | ११,००० |
| तृतीय | 'हौसफुल्ल' | मालवण | ८,००० |
| उत्तेजनार्थ | 'डम डान्सर' | बीड | २,००० |

तसेच लेखन, दिग्दर्शन, उत्कृष्ट स्त्री आणि पुरूष कलावंत, नेपथ्य, प्रकाशयोजना यासाठीही पारितोषिके प्रत्येकी प्रथम क्रमांक रू. १०००/—, व्दितीय कमांक रू. ७५०/— आणि तृतिय क्रमांक रू. ५००/— देण्यात आली. तसेच प्रत्येक विभागासाठी उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम त्याचदिवशी सांस्कृतिक कार्य संचालक श्री. दिलीप शिंदे व अभिनेते श्री. सुनिल बर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आली. अंतीम स्पर्धेचे परिक्षक म्हणून श्री. पुरूषोत्तम बेर्डे, श्री. मंगेश कदम आणि श्री. राजन ताम्हाणे यांनी काम पाहिले. स्पर्धा नियोजन समितीमध्ये श्री. शिवाजी शिंदे श्रीमती शीतल शुक्ल. श्री. सतीश लोटके, श्री. दिगंबर आगाशे आणि श्रीमती गीता सोमण यांचा समावेश होता.

## यशवंत नाटयमंदिर

आपल्या यशवंत नाटयमंदिरास चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत असून नाट्यगृहात होणा-या कार्यक्रमात उत्तरोत्तर वाढ होत आहे. वर्षभरात नाट्यगृहात एकूण ६९७ कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात मराठी कार्यक्रम, इतर भाषिक कार्यक्रम, शुटींग, सभा इत्यादिंचा समावेश आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक नामवंत व प्रसिध्द व्यक्तींनी नाटयगृहास भेट दिली आहे. आपले नाट्यगृह मराठी नाटकांना कमीत - कमी दरात उपलब्ध करून दिले जात असून प्रायोगिक रंगभूमी, बालरंगभूमी आणि हौशी रंगभूमीसाठी नाट्यगृहाच्या भाड्यात पन्नास टक्के सवलत देण्यात येते. नाट्यगृहात मराठी कार्यक्रमांप्रमाणे शुटींग, सभा, इतर भाषिक कार्यक्रम होतात. आपल्या नाट्यगृहास रसिकांचा चांगल्याप्रकारे प्रतिसाद मिळत आहे.